FORM-1A N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर 0154211

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No. ०३, वर्ष Year २०२२, दिनांक Date २८/०९/२०२२

2. (i) अधिनियम Act भ्र. प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलमे Sections ७, १२,
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून २७/०९/२०२२ वेळ १५.३०, तारीख पर्यंत २७/०९/२०२२ वेळ १८.५३
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २७/९/२०२२, वेळ Time १५:३०
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ५/२२, तारीख Date २८/०९/२०२२ वेळ Time ७.०० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव रु. ३२६, ३ रे तळे, सयाजन मुख्यालय प्रवेशद्वाराजवळ, मुंबई.
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ............, गाव ............, पोस्ट ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव —, तालुका —, जिल्हा —, राज्य —
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. अब्दुललतीफ
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name कादर शेख
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५८ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८३३८४७३९०
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............, दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............
   (f) व्यवसाय Occupation इमिटेशन ज्वेलरी
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste —, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address : ४६/४८ जमनामर्कंडास बि / पहिला माळा, रुम नं. १६, इस्माईलपुरा रोड, गिरगाव मुंबई ०४
   Ward, House/Name No., Phone/Mo. No., PAN No., रेशनकार्ड/Card No.
   रस्त्याचे नाव Road ............, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............, जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   १) संजीव होनाजी निंबाळकर वय ५० वर्षे, धंदा - नोकरी (सपोनि डोंगरी पो. ठाणे, मुं). राह. गणेश टॉवर बी-२०१, लुर्दस कॉन्व्हेंट स्कूल समोर, मुरबाड रोड, कल्याण प. जि ठाणे
   २) मोहम्मद अली वल्द मोहम्मद मन्सुरी, वय ४१, धंदा - तुफान प्रेस कॅमेरामन, राह - १५ मस्जिद इस्टेट, दुसरा माळा, रुम नं १६, नळबाजार मुंबई - ४००००३

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

यातील फिर्यादी श्री. अब्दुललतीफ कादर शेख / ५८ वर्षे यांचा स्वतः कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हेच सदर गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

A. Lu

समक्ष

(विक्रम पवार)
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

फिर्यादी

दिनांक २८/०१/२०२२

श्री. अब्दुल लतीफ कादर शेख, वय ५८ वर्षे, धंदा– इमिटेशन ज्वेलरी, रा.ठि. ४६/४८, जमानादास बिल्डींग, १ ला माळा, रूम नं १६, इरलागपुरा रोड, गिरगांव, मुंबई –४००००४, मो.क्र. ९८३३८४७३९०

.........

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी मागील ३५ वर्षापासुन माझ्या कुटुंबासमवेत रहावयास आहे. माझे सोबत माझी पत्नी परवीन लतीफ शेख, वय ६० वर्ष, मुलगा नामे अब्दुल रशिद शेख, वय ३२ वर्ष, व मुलगी हिबा शेख वय २७ वर्ष असे आम्ही एकत्र राहतो. माझा इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय ६६, बनियान इस्टेट, पायधुनी, मुंबई याठिकाणी असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

माझा चुलत भाऊ साजिद इब्राहीम शेख, वय ४५ वर्षे, हा पायधुनी येथे रहावयास असुन तो मटक्याचा धंदा चालवितो. काल दिनांक २७/०१/२०२२ रोजी डोंगरी पोलीस ठाणे येथे सपोनि. निंबाळकर यांनी दुपारी ०१.०० वाजता दरम्यान माझ्या भावाच्या खिशामध्ये मटक्याची चिठ्ठी सापडली म्हणुन त्यास आझाद रेस्टॉरन्ट डोंगरी, ०४ नळ येथून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यास डोंगरी पोलीस ठाणेस नेवून बसवून ठेवले आणि त्याचेवर कायदेशीर कारवाई न करण्याकरीता त्याचेकडे रू. ५०,०००/– रक्कमेची मागणी केली. सदरची रक्कम ही मध्यस्थी/खाजगी इसम नामे मोहम्मद अली मन्सुरी यांचे मार्फतीने आणुन देण्यास सांगितले. त्यावर मध्यस्थी अली मन्सुरी याने मला माझे मोबाईलवर ९८३३८४७३९० वर संपर्क करून डोंगरी पोलीस ठाणेस बोलावून घेतले आणि सांगितले की, सपोनि. निंबाळकर साहेब हे माझे भावाला सोडविण्यासाठी रू. ५०,०००/– रक्कम मागणी करत असुन रक्कम दिली नाहीतर ते त्याच्या विरूध्द मटक्याची केस नोंदविणार आहेत. त्यांनतर मी सपोनि. निंबाळकर यांना भेटण्यासाठी मध्यस्थी यांचे मार्फतीने गेलो असता सपोनि. निंबाळकर यांनी सांगितले की, तु मध्यस्थी अली मन्सुरी यांचेशी बोल, म्हणुन मी अली मन्सुरी यांचेशी बोललो असता त्यांनी निंबाळकर साहेबांना रू. ५०,०००/– रक्कम दयावी लागेल असे सांगितले.

परंतु मला सपोनि. निंबाळकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक २७/०१/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्याकरीता आलो. तेथे आल्यानंतर माझी तक्रार वरिष्ठांना सांगितली व वरिष्ठांनी पो.नि. विक्रम पवार यांना बोलावून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पो.नि. विक्रम पवार हे मला एका कक्षात घेवुन गेले. पो.नि. विक्रम पवार यांनी त्यांचे केबिनमध्ये उपस्थित असलेल्या एका इसमाची ओळख सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सरदार नाळे अशी मला करून दिली व ते माझ्या तक्रारीचे कारवाई दरम्यान देखरेख अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले. पो.नि. विक्रम पवार यांनी माझे तक्रारीबाबत विचारपुस करून मला माझी तक्रार लेखी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मला लिहीता येत नसल्याने त्यांनी संगणकावर माझे सागण्यावरुन तक्रार अर्ज तयार केला व त्याखाली मी माझी स्वाक्षरी केली. नमुद तक्रारीमध्ये सपोनि. निंबाळकर यांनी रू. ५०,०००/– लाच मागितली असून त्यावर कारवाई होणेकरिता लेखी तक्रार अर्ज पो.नि. विक्रम पवार यांचेकडे दिला.

पो.नि. विक्रम पवार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आवश्यक कारवाई पुर्ण करून माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मी, पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातून लोकसेवक यांचे कार्यरत ठिकाणी डोंगरी पोलीस ठाणे येथे जाणेकरिता पथकासह रवाना झालो. आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथून वरळी नाका, मार्गे माझगांव भगवान आदिनाथ मार्ग, माझगाव, मुंबई येथे आल्यावर पो.नि. विक्रम पवार यांचे सांगण्यावरून वाहन चालकाने वाहन कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबविण्यास सांगितले,

त्यांनतर मला शर्टाच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे सोबत पंच श्री. जाधव यांचेसह लोकसेवक सपोनि. निंबाळकर यांना भेटण्याकरीता डोंगरी पोलीस ठाणे येथे गेलो असता, तेथे लोकसेवक श्री निबांळकर यांची भेट झाली. माझे सोबत मध्यस्थी मोहम्मद अली मोहम्मद वली मन्सुरी हा

देखील हजर होता. मी लोकसेवक श्री निंबाळकर याच्याशी चर्चा करीत असतेवेळी लोकसेवक निबांळकर यांनी मला " तुम कुछ भी करो आप लाके दो... आप... बिचमें गिरेना... आप... लाके दो... " दस मिनिट है ही उस में भी..." असे म्हणुन रु.२०,००० लाच रक्कमेची मागणी करुन सदरची रक्कम दहा मिनीटामध्ये आणुन देण्यास सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आहे.

पडताळणीच्या वेळी झालेल्या संभाषणाची हकीगत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक सपोनि. निंबाळकर यांनी पडताळणीमध्ये मध्यस्थी मोहम्मद अली मोहम्मद वली मन्सुरी यांचे वतीने रू. २०,०००/– रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने व लोकसेवक सपोनि. निंबाळकर यांनी लाचेची रक्कम दहा मिनीटामध्ये आणुन देण्यास सांगितल्याने त्वरीत सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि विक्रम पवार यांनी सांगितले. मी लाच देण्याकरिता रक्कम सोबत आणली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी लाचेकरीता लागणारी रक्कम मी माझे बचतीमधुन आणली असल्याचे पो.नि. पवार याना सांगितले. माझे बचतीतील रूपये अठरा हजार रक्कम (रू. ५००/– दराच्या ३६ भारतीय चलनी नोटा) पो.नि. विक्रम पवार यांचे समक्ष सादर केल्या. त्यांनी सापळा पथकातील अंमलदारा मार्फत माझी अंगझडती घेतली व मी लाच म्हणून देण्याकरिता आणलेली रक्कम रू. १८,०००/– वगळून अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या इतर चीजवस्तू व रक्कम मला परत केली व ती पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवण्यास सांगितली.

त्यानंतर पो.नि. विक्रम पवार यांनी मला व पंचांना लाचेकरिता दयावयाचे रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही आलेल्या पोलीस वाहनाचे चालक श्री. मोकल यांना बोलावून मला व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक सापळा कारवाई नंतर दाखविण्यात येणार असल्याचे मला व पंचाना सांगितले. त्यावेळी त्यांनी गाडीत असलेल्या पेटीतून एक डब्बा बाहेर काढून अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. त्यानंतर लोकसेवक सपोनि. निंबाळकर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नतर इशारा म्हणुन माझे डोक्यात असलेली लाल रंगाची कानटोपी काढुन टाकण्याचा इशारा करण्यासा सांगितला. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले व सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या आवश्यक त्या सुचना मला व पंच श्री. जाधव यांना दिल्या.

त्यानंतर पोलीस वाहनात वाहन चालक श्री. मोकल यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावुन सदरची रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये अलगत ठेवली. पो.नि. विक्रम पवार यांनी यापुढील कारवाईत श्री. मोकल सहभागी असणार नाहीत असे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. विक्रम पवार यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. जाधव यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांनी बोलविलेल्या ठिकाणी म्हणजे सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्टेशन, मुंबई प्रवेशव्दाराजवळ येण्यास सांगितले. त्यावरुन मी व पंच श्री जाधव यांचेसह टॅक्सीने रवाना झाला.

माझे पाठोपाठ पोलीस पथक देखील टॅक्सीने येवुन काही अंतर ठेवून टॅक्सीतुन उतरले. त्यानंतर मध्यस्थी इसम मोहम्मद अली मोहम्मद वली मन्सुरी हा सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्टेशन मुंबई येथे आला होता. मी मोहम्मद अली शेख यांस भेटलो व त्यास सपोनि. निंबाळकर यांना भेटावयाचे आहे असुन सांगितले असता मोहम्मद अली मन्सुरी यांनी सपोनि. निंबाळकर यांना तेथे बोलावले असता सपोनि.निंबाळकर हे त्याठिकाणी आले. परंतु नमुद ठिकाणी जास्त गर्दी असल्याने सपोनि. निंबाळकर हे मला सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्टेशन टिकीट काउन्टर येथे घेवून आले. सदरवेळी पोलीस पथक माझे काही अंतरावर उभे राहून पाळत ठेवत होते. त्यानंतर पुन्हा सपोनि. निंबाळकर यांनी तेथेच थांबवुन मोबाईलवर बोलत शौचालयाजवळ गेले व काही मिनिटातच पुन्हा सपोनि निंबाळकर माझे जवळ आले व सांगितले की, "मै जा रहा हु निचे... निचे भेज दे ना उसे.." त्यावेळी मध्यस्थी इसम मोहम्मद अली मन्सुरी तेथे आला व त्याने माझेकडे " लाव पैसे दे दो लाव...असे सांगितल्याने

मी माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यातील रु.१८,०००/- लाचेची रक्कम बाहेर काढुन मध्यस्थी यांचे समोर केली असता, त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या मागील उजव्या खिश्यात ठेवली. तेव्हा सपोनि निंबाळकर देखील बाजुस उभे होते. त्यावर मी लागलीच सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा म्हणुन माझे डोक्यावरील लाल रंगाची कानटोपी काढुन सापळा पथकास इशारा केला. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यानी सपोनि निंबाळकर व मध्यस्थी मोहम्मद अली मन्सुरी यांस लाच स्विकारताना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. पवार यांनी माझे शर्टास लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन स्वत:च्या ताब्यात घेतला.

त्यानंतर हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई पायधुनी वाहतुक चौकी येथे पूर्ण करण्यात आली. सदर वाहतुक चौकीत पुढील कारवाई करण्याकरिता आवश्यक जागा विद्युत पुरवठयासह उपलब्ध नसल्याने तसेच कारोना संसर्गजन्य आजारामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावून करण्यात येणार असल्याचे पो.नि.विक्रम पवार यांनी सांगितले. त्यानुसार मी, पंच, लोकसेवक सपोनि. निंबाळकर व खाजगी इसम मोहम्मद अली वली मोहम्मद मन्सुरी यांचे सह लाचलुचपत कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

कार्यालयात आलेवर पोनि विक्रम पवार यांनी पंचांसमक्ष वर नमुद लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव व पदा बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे (१) श्री. संजीव हेनाजी निंबाळकर, वय ५० वर्षे ( सहाय्यक पोलीस निरीक्षक ) डोंगरी पोलीस ठाणे (२) श्री. मोहम्मद अली वली मोहम्मद मन्सुरी, वय ४१ वर्षे ( खाजगी इसम ), असे सांगितले.

माझा चुलत भाऊ साजिद इब्राहीम शेख, वय ४५ वर्षे, याचे खिश्यामध्ये मटक्याची चिट्ठी सापडली म्हणुन आझाद रेस्टॉरन्ट, डोंगरी ४ नळ, मुंबई येथून ताब्यात घेवून त्यास डोगरी पोलीस ठाणेस नेवून बसवून ठेवले व त्यांचेवर कायदेशीर कारवाई न करण्याकरीता खाजगी इसम नामे मोहम्मद अली वली मोहम्मद मन्सुरी यांनी लोकसेवक सपोनि. निंबाळकर यांचे वतीने माझे चुलत भाऊ साजिद शेख यांस सोडविण्याकरीता रु. २०,०००/- रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रू. १८,०००/- इतक्या रकमेची लाच मागून ती माझेकडून स्विकारली म्हणुन माझी सपोनि. निंबाळकर व मोहम्मद अली वली मोहम्मद मन्सुरी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. लोकसेवक सपोनि. निंबाळकर व मध्यस्थी इसम मोहम्मद अली वली मोहम्मद मन्सुरी यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( विक्रम पवार )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या चुकत आलेल्या खिशात मटका खेळण्याच्या नोंदी असलेला कागद भेटला म्हणून त्यांचेवर कायदेशिर कारवाई न करण्याकरीता आणि कायदेशिर परिश्रमाखेरीज लोकसेवक याने मध्यस्थीच्या माफतीने २०,०००/- रु ची लाचेची रकमेची मागणी करून तडजोडीअंती १८,०००/- रु. स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पोलीस निरीक्षक विक्रम पवार, ला.प्र.वि. मुंबई.
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — ........, जिल्हा ........ — ........, राज्य ........ — ........
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No................ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ................................................ District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)
[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name... विक्रम शिवाजी पवार
पदनाम Rank... पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.
तपासिक अं. चा कोड क्र. ........
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**